सभा नंबर :-  दिनांक :- ११/१२/२०२३

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|

[redacted] महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी समितीची सभा IQAC आज दिनांक ११ डिसेंबर २०२३, सोमवार रोजी दुपारी/सकाळी १०.०० वाजता मा. प्राचार्य डॉ. के.जी. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य दालनात घेण्यात आली. त्या सभेचे इतिवृत्त पुढील प्रमाणे –

[redacted] सभे पुढील विषय –

१ – मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे

२ दिनांक ०२ व ०३ नोव्हेंबर रोजी नॅक समितीने दिलेल्या भेटीवर चर्चा करणे

३ – नॅक समितीने दिलेल्या महाविद्यालयाच्या मानांकावर चर्चा करणे

४ – शै. वर्ष २०२४-२५ मध्ये महाविद्यालयात विविध सर्टिफिकेट कोर्स, कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरु करण्या बाबत चर्चा करणे

५. नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शै. वर्ष २०२४-२५ पासून पदवीस्तरावर होत असल्यामुळे त्यावर चर्चा करणे

६ शै. वर्ष २०२२-२३ चा AQAR सादर करणे बाबत काम कोजाला आदाना घेणे.

७. आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

[redacted] उपस्थिती

१ निलेश वसुदेव चौधरी — नि.वा.चौधरी
२ प्रा. डॉ. किशोर गोविंदराव कोल्हे (प्राचार्य) — (sign)
३ प्रा. जतिनकुमार सुधिर मेढे — (sign)
४ डॉ. दिनेश हिंमतराव पाटील. — (sign)
५ डॉ. दिनेश रामदास महाजन — (sign)
६ दिलीपकुमार त्र्यंबक रंगरे — (sign)
७ प्रा. डॉ. पद्माकर अर्जुन सावळे — (sign)
८ डॉ. दिगंबर खोब्रागडे — (sign)
९ डॉ. मिनाक्षी संजय वाघुळदे — Waghulade

Co-ordinator IQAC S.E. Society's Arts & Science College, Bhalod

# प्रोसिडींग बुक

सभा नंबर :-

MB/ अजिंठा / सोसा.प्रो. -1/9/ BP.

दिनांक :- ११/ १२/२०२३

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | १०. प्रा डॉ. वसंतराव परशुराम पवार [signature]<br>११) डॉ जी. आर. चौधरी [signature] |
| १ | मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे | मागील सभेचे प्रोसिडींग या सभेत वाचून दाखविण्यात आले. त्याला एकमताने या सभेत मंजुरी देण्यात आली.<br>सूचक :- डॉ. दिनेश रामदास महाजन<br>अनुमोदक :- नितीन वासुदेव चौधरी (सचिव, से.ए.सो.) |
| 2 | नॅक समितीने महाविद्यालयास दिलेल्या भेटीवर चर्चा करणे- | नॅक समितीने दिनांक 02 व 03 नोव्हेंबर 2023 रोजी महाविद्यालयास भेट देवून पाहणी केली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध अभ्यासक्रम व शैक्षणिक सुविधा निर्माण करणे बाबत चर्चा करण्यात आली. नविन अभ्यासक्रमांना शासन अनुदान देत नसल्यामुळे विना अनुदान तत्वावरील विविध अभ्यासक्रम सुरु करताना विद्यार्थी व महाविद्यालय यांचेवर आर्थिक भार पडणार नाही असे अभ्यासक्रम उपक्रम सुरु करावेत यावर एकमत झाले.<br>सूचक :- दिलीपकुमार त्र्यंबक इंगळे<br>अनुमोदक :- प्रा. डॉ. पद्माकर अर्जुन सावळे |
| ३ | नॅक समितीने दिलेल्या मानांकनावर चर्चा करणे - | नॅक समितीने महाविद्यालयाची पाहणी करून 'सी' मानांकन (C ग्रेड) दिलेली असल्याची माहिती या सभेत सादर करण्यात आली.<br>नॅक समितीने महाविद्यालयाकडून व्यक्त केलेल्या अपेक्षा व उणिवा यावर सभेत चर्चा करण्यात आली. नॅक समितीने सूचविलेले शैक्षणिक उपक्रम / अभ्यासक्रम, भौतिकसुविधा अधिका-अधिक सक्षम कशा करता येतील यावर चर्चा होवून खालील निर्णय सर्वानुमते घेण्यात आले.<br>१- कला व विज्ञान शाखेत विविध सर्टीफिकेट कोर्स सुरु करणे.<br>2. विद्यार्थिनी करीता विविध सुविधा वाढविणे<br>3- विविध महाविद्यालये, संस्था यांच्याशी संशोधन विषयक करार करणे - (MOU). |

सभा नंबर :-  दिनांक :- ११ / १२ / २०२३

| विषय नं. | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | ४ - संशोधनासाठी निधी उभारणे.<br>५ - ग्रंथालय आधुनिक सुविधांनी सक्षम करणे<br>६ - ICT क्लास रूम यांची संख्या वाढविणे.<br>७ - माजी विद्यार्थी संघटना नोंदणीकृत करणे.<br>सूचक :- प्रा. डॉ. जी. आर. चौधरी<br>अनुमोदक - प्रा. डॉ. मिनाक्षी संजय वाघुळदे |
| ४. | शै. वर्ष 2024-25 मध्ये महाविद्यालयात विविध सर्टीफिकेट कोर्स सुरु करणे. | विषय क्र. ०३ मध्ये या विषयाला मंजूरी देण्यात आल्याने या विषयावर चर्चा न करता सुरु करण्याबाबत एक मताने मंजुरी देण्यात आली.<br>सूचक - प्रा. डॉ. वसंतराव परशराम पवार<br>अनुमोदक - डॉ. दिगंबर खोब्रागडे |
| ५ | नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शै. वर्ष 2024-25 पासून होत असल्याने त्यावर चर्चा करणे. | प्रा. डॉ. जी. आर. चौधरी व प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे यांनी नविन शैक्षणिक धोरणाची सविस्तर मांडणी सभेसमोर केली. केंद्रसरकार व महाराष्ट्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना व आदेशानुसार प्रथम वर्ष कला व विज्ञान या वर्गाच्या अभ्यासक्रम, विषय, मूल्यांकन ग्रेड, पद्धती इ. बाबत चर्चा व कार्यवाही होणेसाठी महाविद्यालयात समिती स्थापन करण्यात यावी. या समितीने सर्व प्राध्यापकांना नविन शैक्षणिक धोरणातील सर्व बारकावे समजावून सांगावेत. प्रवेश समिती मार्फत करून विद्यार्थ्यांना प्रवेश घेते वेळी बदललेल्या नविन शैक्षणिक धोरणाची माहिती देण्यात यावी. व जुन 2024 पासून नविन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी असे एकमताने ठरले.<br>सूचक - श्री. नितीन वासुदेव चौधरी (से. ए. सोसायटी, सचिव)<br>अनुमोदक - प्रा. डॉ. मिनाक्षी संजय वाघुळदे |

सभा नंबर :-

दिनांक :- ११ / १२ / २०२३

| विषय नं. | विषय | ठराव |
|---|---|---|
| 0६ | शै. वर्ष 2022-23 च्या AQAR सादर करण्या बाबत कामकाजाच्या आढावा घेणे. | शै. वर्ष 2022-23 च्या AQAR चे डाटा संकलन पूर्ण झालेला असून. कामकाज समाधान-कारक असल्याने नॅकच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मुदतीच्या आत नॅककडे सादर करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले<br>सूचक – प्रा. डॉ. दिनेश हिंमतराव पाटील<br>अनुमोदक – प्रा. डॉ. वसंतराव परशराम पवार |
| 0७ | आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे | आयत्या वेळी सभेसमोर अंतर्गत गुणवत्ता हमी समितीच्या सदस्यांनी काही विषय चर्चेला घेतले असता पुढील विषयांच्या अंमलबजावणी साठी मंजुरी देण्यात येत आहे. असे सर्वानुमते ठरले<br>१- खासदार निधीतून बांधण्यात आलेल्या सभागृहात लाईट / फॅन व्यवस्था करणे<br>२- महाविद्यालयातील विशेष स्थापन केलेल्या चार अभ्यासकेंद्रासाठी निधी मिळविण्यासाठी NGO कडे प्रस्ताव सादर करणे.<br>३. शैक्षणिक सहलींचे प्रभावी आयोजन करणे.<br>सूचक – श्री नितीन वासुदेव चौधरी<br>(से.ए.सोसायटी, सचिव)<br>अनुमोदक – प्रा. डॉ. दिनेश रामदास महाजन |

PRINCIPAL
S.E. SOCIETY'S
ARTS & SCIENCE COLLEGE
BHALOD.DIST.JALGAON

Co-ordinator
IQAC
S.E. Society's Art's &
Science College, Bhalod